जा क्र.ई-१/सपोफौ-पोउपनि बि.सं.(भांडार)/पदोन्नती/२०२१/ 1856
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे ८
यांचे कार्यालय.दिनांक : - 26 / ०३ / २०२१

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ब, दि.२५/५/२००४.
२)शासन अधिसूचना,समान्यप्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दि.२८/४/२०१५,
३)शासन अधिसूचना सुधारणा दि.१६/७/२०१५ आणि अधिसूचना (दुसरी सुधारणा) दि.१५/६/२०१७
४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.१/८/२०१९
५)सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक १८/२/२०२१

**विषय :-** पोलीस बिनतारी संदेश विभागातील सहाय्यक पोलीस उप निरीक्षक (भांडारपाल) यांना पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (भांडार) या पदावरील पदोन्नतीवर पदस्थापना देणे बाबत.

*************

**आ दे श :-**

उपरोक्त संदर्भामध्ये नमूद केलेल्या शासन निर्णय व अधिसुचनांचे पालन करुन पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमूद केलेल्या सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (भांडारपाल) यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मध्ये महसूली विभागाचे वाटप करण्यात आले असून रकाना क्र.५ मध्ये दर्शविलेल्या घटकात त्यांची पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (भांडार) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहुन पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे.

**सहा. पो.उपनि बि.सं.( भांडार पाल) -मॅट्रीक्स वेतन एस-१० रु.२९२०० ते ९२३००**
**पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (वाहतुक) मॅट्रीक्स वेतन एस-१४ रु.३८६०० ते १२२८००**

| अ. क्र. | सपोउनि (प्र.यं.चा.) यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | संदर्भामधील तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेला महसुली संवर्ग | पो.उप नि. बि.सं.(भांडार) पदावर दिलेल्या पदोन्नतीवरील नेमणूक | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातुन दिली व अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | श्री.विश्वास लक्ष्मण डोंगरे, **(खुला)** | **संचालक बि.सं. कार्यालय पुणे** | कोकण -२ | पोलीस उप आयुक्त बिनतारी संदेश, मुंबई शहर | रिक्त पदी |

२. उपरोक्त सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक त्याच दिवशी हया कार्यालयास कळवावा. तसेच ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होताच, त्यांनी पोलीस उप निरीक्षक बि.सं.(भांडार) पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक सुध्दा संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब हया कार्यालयास कळवावा.

**३** उपरोक्त नमुद केलेल्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) यांच्या विरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असले / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ पाठवावी व पुढील आदेशांची वाट पहावी.

४. उपरोक्त आदेशांत नमूद केलेल्या सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) यांचेविरुध्द जर विभागीय चौकशी प्रलंबित असेल अथवा विभागीय चौकशीत निर्गमीत केलेल्या शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नसेल तर अशा सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) यांचेकडून दिनांकित स्वाक्षरी केलेले लेखी हमीपत्र घेवून व त्यास अधिन राहुनच, त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे, तसेच संबंधीत सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त

केलेल्या आदेशातही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व त्यांच्या लेखी हमीपत्राची प्रत हया कार्यालयास सादर करण्यात यावी. तसेच त्याची प्रत संबंधीत सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) ज्या घटकात आता पदोन्नतीवर हजर होणार आहेत, त्या घटकप्रमुखांना देखील न चुकता पाठवावी. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५. सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) ते पोलीस उप निरीक्षक बि.सं.(भांडार) पदावर देण्यात येणा-या सर्व पदोन्नती मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र.२७९७/२०१५ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या तसेच शासन निर्णय दिनांक १८/२/२०२१ च्या अधिनस्त राहुन निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहेत.

७. सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) यांना पोलीस उप निरीक्षक बि.सं.(भांडार) पदावर पदोन्नतीवरील पदस्थापना, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र१५६/कार्या-१२, दिनांक २८/४/२०१५, अधिसूचना सुधारणा दि.१६/७/२०१५ व अधिसूचना (दुसरी सुधारणा) दिनांक १५/६/२०१७ मधील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे.

८. सदर पदोन्नती आदेशांमधील सहा.पो.उप निरीक्षक बि.सं.(भांडारपाल) यांना घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

९. पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर १२९८/प्रक्र-१३/९८/सेवा -१० दि.१०/१२/९८ च्या आदेशाची माहिती पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश (भांडार) या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से. (वेतन)नियम -१९८१,नियम क्र.११(एक)(ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

१०. सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ घेत असल्यास संबंधीत अंमलदारास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही. संबंधीत अंमलदार पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची से.आ.प्र.यो. अंतर्गत देण्यात आलेला वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल अशी संबंधीतास स्पष्ट समज देण्यात यावी. तसा अनुपालन अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

११. पोलीस बिनतारी संदेश विभागा तर्फे पदोन्नत अधिकारी यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देणेत येत आहेत.

Retesh

( रितेश कुमार )
**अपर पोलीस महासंचालक व संचालक,**
**दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति,**

पोलीस उप आयुक्त, बिनतारी संदेश, मुंबई शहर

प्रत सादर :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (लक्षवेध - कार्यासन क्र ३ अ )
पोलीस आयुक्त, मुंबई शहर.

प्रत : -

पोलीस उप अधीक्षक, बि.सं., मुख्यालय, पुणे.

स्थानिक प्रती :-

पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.
गृह पोलीस निरीक्षक, संचालक कार्यालय, पुणे / प्रमुख लिपिक आस्थापना शाखा - १
/ई-५ लिपीक/ भरती कक्ष /क शाखा / आदेश -फाईल.